# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**(बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

**सर्वश्री अंबादास दानवे**, अमरनाथ राजूरकर, एकनाथ खडसे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, सर्वश्री सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विलास पोतनीस, जयंत आसगावकर, किरण सरनाईक, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री शशिकांत शिंदे, सतेज उर्फ बंटी पाटील, अब्दुलाखान दुर्राणी, आमश्या पाडवी, राजेश राठोड, सचिन अहिर, नरेंद्र दराडे, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव –**

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, घरफोड्या, जुगार व अपहरणाच्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, ज्येष्ठ नागरिकांच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, गुटख्याची तस्करी, वाहतूक, साठवण व विक्री जोमात सुरु असणे, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पोलिसांच्या बेदरकार वृत्तीमुळे गोंदिया जिल्ह्यात एका महिलेवर नराधमांनी वारंवार केलेला अत्याचार, पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कोथूर्णे गावातील अल्पवयीन मुलीवर अमानुष अत्याचार करुन मृतदेह झुडपात फेकून दिला असणे, संपूर्ण देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सहा नराधमांनी अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली असणे, भद्रावती येथे आश्रमशाळेत शिक्षकाने विद्यार्थीनीवर चाकूचा धाक दाखवून बलात्कार करणे, अशाच प्रकारच्या घटना बीड, मावळ, मुंबई व अन्य ठिकाणी एकामागोमाग घडल्यामुळे महिला, मुली यांच्यात पसरलेले भीतीचे व चिडीचे वातावरण, ठाणे येथे महिला पोलीस कर्मचाऱ्याने केलेली आत्महत्या, डान्स बारला आळा घालण्यात आलेले अपयश, खुद्द मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थानापासून हाकेच्या अंतरावर कोपरी, कापुरबावडी व इतर परिसरात डान्सबार सुरु असल्याची बाब माध्यमांनी उघडकीस आणलेली असणे, पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणाची स्वतंत्र

एसआयटी नेमून चौकशी करण्याची आवश्यकता, सायबर गुन्हेगारांनी अनेकांची केलेली फसवणूक, मुंबईतील खार येथे दिवसाढवळ्या गोळीबार करुन दहशत निर्माण करण्याचा केलेला प्रयत्न, गुंड टोळयांच्या वाढत्या प्रमाणामुळे निर्माण झालेले दहशतीचे वातावरण, सत्ताबदल झाल्यानंतर सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांकडून शासकीय अधिकारी यांना करण्यात आलेली मारहाण तसेच चिथावणीखोर वक्तव्यांमुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची निर्माण झालेली शक्यता, गुंडांचे झालेले उदात्तीकरण, कोथरुड, पुणे येथे कामगाराला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून लाथाबुक्क्याने अमानूष मारहाण करण्यात आलेली असणे, भ्रष्टाचार, खंडणी व अन्य कारणांसाठी निलंबित करण्यात आलेल्या काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना चौकशी पूर्णत्वास जाण्याअगोदरच सेवेत घेतल्याने, प्रामाणिक अधिकाऱ्यांचे झालेले खच्चीकरण तसेच भ्रष्ट अधिकाऱ्यांचे वाढलेले मनोबल, मागील काळात सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या घटना घडल्या असून त्यास कारणीभूत असलेल्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता असणे, मुंबई व आसपासच्या परिसरात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, रेल्वे हद्दीतील गुन्हेगारीत झालेली प्रचंड वाढ, लोकप्रतिनिधीना दलालांमार्फत दाखविण्यात आलेले अमिष, पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होत नसणे, मुंबई व उपनगरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रकल्प दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, तसेच, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या योजना, सेसच्या इमारतींच्या पुनर्विकास योजना आणि अन्य पुनर्विकास, अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे अर्धवट स्थितीत असून विस्थापित झालेल्या रहिवाश्यांना विकासकांकडून घरभाडे देखील अदा केले जात नसणे, झोपडपट्टी पुनर्विकास करताना एक अधिक एक मजला असल्यास पहिल्या मजल्यावरील रहिवासी मालमत्ता कर, लाईट बिल भरत असल्यामुळे त्यांनाही पात्र समजून लाभ देण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, अवैध वाळू व मुरुम उत्खनन माफियांचा सर्रास गैरप्रकार व दादागिरी वाढणे तसेच उप विभागीय अधिकारी, प्रांत व तहसीलदार यांच्यावर वाळू माफियांकडून प्राणघातक हल्ले वाढणे, मुंबई, व राज्यातील इतर अनेक भागात, विशेषत: ठाणे जिल्ह्याच्या प्रवेश मार्गात खड्डेमय रस्त्यामुळे वाहतुक खोळंबून सर्वसामान्यांना होणारा प्रचंड त्रास, मुंबईच्या पश्चिम व पूर्व द्रुतगती महामार्गावर सकाळी व सायंकाळी होणारी वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढलेले प्रमाण, नगरपालिका व महानगरपालिका प्रभाग रचना बदल करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे यंत्रणेवर पडलेला बोजा, खर्चात

अमुद्रित प्रत

झालेली वाढ व राजकीय कारणासाठी निर्णय घेतला असल्याबाबत जनतेच्या मनात शंका निर्माण झाली असणे, अनावश्यक बुलेट ट्रेनकरिता मुंबई व आसपासच्या कोट्यवधी रुपयांच्या जागा कवडीमोल भावाने दिल्या जाणे आणि शासकीय तिजोरीवर नाहक सहा हजार कोटी रुपयांचा बोजा पडला असणे, पर्यावरण तज्ज्ञ व पर्यावरणप्रेमींचा ठाम विरोध असतानाही आरे येथे कारशेड उभारण्याकरिता पुन्हा बेकायदेशीररित्या झाडे तोडण्याचे काम सुरु केले असणे, तसेच राज्यात कोविड विषाणू प्रादुर्भाव पुन्हा जोर धरु लागला असणे आणि मंकी पॉक्स, झिका व्हायरस, लेप्टो व मलेरीया, हत्तीरोग, स्वाईन फ्ल्युच्या आजारांनी थैमान घातले असताना प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात सरकारला आलेले अपयश, पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील एका आदिवासी गर्भवती महिलेला आरोग्य व दळणवळणाच्या सुविधा वेळेत न मिळाल्याने नवजात जुळ्या मुलांचा डोळ्यादेखत झालेला दुर्देवी मृत्यू, राज्यात कोणत्याच शासकीय विभागांना ४६ दिवस मंत्री नसल्यामुळे एकंदरीत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, तसेच राज्यात शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षकांच्या टीईटी परीक्षेत, निवड व भरती प्रक्रियेत सनदी अधिकारी, संचालक, संस्था चालक व त्यांचे पदाधिकारी यांचे आर्थिक हितसंबंध असल्याची गंभीर बाब निदर्शनास आलेली असणे, लोकप्रतिनिधींच्या मुला-मुलींच्या नावाचा समावेश असल्याचेही उघड झाले असणे, तसेच पेट्रोल व डिझेलची केलेली अपुरी करकपात आणि केंद्र व राज्यसरकारच्या चुकीच्या धोरणामुळे, प्रचंड प्रमाणात वाढलेली महागाई, परिणामी हातावर पोट असणाऱ्या, गरीब, सामान्य नागरिकांना दैनंदिन जीवन जगणे जिकरीचे झाले असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अशुद्धित प्रत

**(दुपारी १२.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क)** गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला **श्री.विक्रम काळे व इतर वि.प.स.** यांचा "**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना त्रुटी पूर्ततेनंतर अनुदान मंजूर करण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक १४२२**

**(ख) तारांकित प्रश्न**

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव —**

मार्गारिटा रूडोमिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर मॉस्को, रशिया यांनी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा संस्थेच्या प्रांगणात बसविल्याबद्दल या संस्थेचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०१९ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीतील चौदावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** :

**(क)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा "सन २०२० २०२१ या वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा "महाराष्ट्रात चौऱ्याहत्तरावी संविधान सुधारणा अधिनियमाच्या अंमलबजावणीची परिणामकारकता यावरील अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "शासनाच्या गृह विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या वर्षाचा स्वतंत्र लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी

असुधारित प्रत

मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०१२-२०१३, सन २०१३-१०१४, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** "महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(त्र)** "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्रशिक्षण आणि वस्त्रोद्योग मंत्री :**

**(क)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई

अस्थायी प्रत

यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा दिनांक १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१६, १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१७, १ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च, २०१८ व १ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीचे लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे व संविधानिक लेखापरीक्षण अहवाल"

**(च)** महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **बंदरे आणि खनिकर्म मंत्री** :

**(क)** "महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे प्रशासकीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र सागरी महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या वर्षांचे स्वतंत्र लेखा परिक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **रोजगार हमी योजना मंत्री** : "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(६) **उद्योग मंत्री** :

**(क)** "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

अस्थायी प्रत

| | | |
|---|---|---|
| | | **(ख)** "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचा अनुक्रमे छप्पन्नावा व सत्तावन्नावा वार्षिक अहवाल" |
| **(७)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | : (क) **"राज्यात सातत्याने वाढत आलेली महागाई आणि शासनाच्या विविध खात्यांत होणाऱ्या घोटाळयांमुळे जनतेच्या मनात असंतोष निर्माण होणे"** या विषयासंदर्भात सर्वश्री धनंजय मुंडे व इतर, विधानपरिषद सदस्य, यांनी सन २०१६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये विधानपरिषद सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला होता. सदर प्रस्तावावरील चर्चेदरम्यान तत्कालीन मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने, अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(ख)** **"चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात विविध साथीच्या आजारांची झालेली लागण" या विषयावरील** श्रीमती शोभाताई फडणवीस व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम, १०१ अन्वये लक्षवेधी सूचना दिनांक ११ जुलै, २०१२ रोजी झालेल्या चर्चेच्यावेळी तत्कालीन (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील. |

**चार** : **"वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा आठवा, नववा व दहावा एकत्रित अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे."**

**पाच** : **(क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना निवेदने –**

(१) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"मुंबईमध्ये अंमली पदार्थांचा साठा जप्त करणेबाबत."

(२) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २** वर **ग्रामविकास मंत्री** निवेदन करतील **:-**

"ग्रुप ग्रा.प.माणकुळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ग्रामपंचायतीमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत."

(३) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ४** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील **:-**

"अकोला (जि.) बार्शी टाकळी तालुक्यातील चांगेफळ-कान्हेरी-एरंडा रस्त्याच्या निकृष्ट कामासंदर्भात."

(४) **श्री.विलास पोतनीस, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील सर्व शाळांत मराठी विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण १०० गुणांचा बंधनकारक करण्याबाबत."

**सहा : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ व बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) व (२)] —**

**(१)** **सर्वश्री अंबादास दानवे,** आमश्या पाडवी, दुष्यंत चतुर्वेदी, शशिकांत शिंदे, अमरनाथ राजूरकर, सतिश चव्हाण, विक्रम काळे, अमोल मिटकरी, सचिन अहिर, सुनिल शिंदे, विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग मृत्यूचा सापळा बनत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, दिनांक १४ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या भीषण अपघातात

अग्रिम प्रत

शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याने या महामार्गाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर येणे, मुंबई - पुणे महामार्गावरील अपघात आणि ते रोखण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न आदी मुद्दे ऐरणीवर येणे, पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वेवर (द्रुतगती मार्ग) गेल्या दीड वर्षात तीनशे अपघातांमध्ये १२५ प्रवाशांचा मृत्यू झाला असणे, तर २११ जण गंभीर जखमी झाले असणे, सन २०२२ च्या ऑगस्ट महिन्यांपर्यंत ३० अपघात घडून ४० जणांचा मृत्यू झालेला असणे, वाहनांसाठी घाट परिसरात प्रति तास ५० कि.मी. तर अन्य ठिकाणी प्रति तास १०० कि.मी. वेगमर्यादा निश्चित केलेली असताना वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे पालन करण्यात येत नसणे, सीटबेल्ट न लावणे असे अनेक प्रकार या द्रुतगती मार्गावर दिसून येणे, त्याचप्रमाणे अपघात झाल्यास तातडीने ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध होत नसल्याने अपघातग्रस्तांना त्वरीत उपचार मिळत नसल्याने मृत्यू संख्येत होत असलेली वाढ, परिणामी भरधाव वेगामुळे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात या महामार्गावर अपघात नेहमीच होते असणे, वेग मर्यादेचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत असली, तरी वाहनचालक कारवाईस जुमानत नसणे, याव्यतिरिक्त निरनिराळ्या प्रकारच्या वाहनांना आखून दिलेल्या मार्गिकांचा वापर न करता वाहने बेदरकारपणे चालविण्यात येणे, हे हि वाढत्या अपघाताचे मुख्य कारण असणे, त्यामुळे देशातला पहिला एक्स्प्रेस हायवे अशी ओळख असलेल्या या महामार्गावरून प्रवाशांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागणे, परिणामी या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशी आणि वाहनचालकांत पसरलेले भीतीचे साम्राज्य, यास्तव मुंबई-पुणे महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासाठी तसेच महामार्गावर ठराविक अंतरावर ट्रॉमा केअर केंद्र उभारण्याबाबत शासनाने तातडीने हाती घ्यावयाच्या उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने केंद्रीय औद्योगिक नीतीचा पुरेपूर फायदा घेण्यात येऊन भांडवलदारांना प्रचंड सवलती देऊन औद्योगिक गुंतवणुकीला प्रोत्साहित करणे, उद्योगांना स्वस्तात मजूर व स्वस्तात कच्चा माल मिळावा यासाठी शेतकऱ्यांवर शेतमालाला कधीही जिल्हाबंदी, राज्यबंदी तर कधी निर्यातबंदी सारखे अत्यंत अन्यायकारक नियंत्रण लादणे, जमीन धोरणाचे नियंत्रण आणणे, परिणामी शेतातून होणाऱ्या उत्पन्नावर नुकसान होऊन शेतकऱ्यांवर कर्जाचे डोंगर निर्माण होणे, हरितक्रांतीमुळे कृषी क्षेत्रात

उत्पादक प्रचंड प्रमाणात वाढले, मात्र राज्य शासनाच्या सापत्न आर्थिक नीतीमुळे या शेती उत्पन्नातून उत्पन्न निर्माण झाले नाही पण कर्ज निर्माण होणे, परिणामी राज्यातील शेतकरी आगतिकतेने कर्जबाजारी होऊन आत्महत्याच्या उंबरठ्यावर पोहोचणे, राज्यात दररोज कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत असणे, त्यामुळे शासनाने यापुढे नव्याने शेती निधी जाहीर करून तिची परिणामकारक अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असताना याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीची कारवाई व उपाय योजना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ व बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)** — **[अनुक्रमांक (३) ते (६)]** —

**(३)** **प्रा.राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास कमल सिंघ व त्याचा सोबत असलेले काही सहकारी यांनी नगर जिल्ह्यातील गावागावात जाऊन लोकांना पैशाचे खोटे आमिष दाखवून अनधिकृतरित्या धर्मांतरण केल्याची बाब उघडकीस येणे, राहुरी येथील प्रगती विद्यालय आणि ब्राम्हणी येथे मोठ्या प्रमाणात स्थानिक लोकांचे धर्मांतर करून श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे पुढील कार्यक्रम नियोजित केलेला असणे, तसेच याबाबत अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी पोलीस स्टेशनमध्ये अनधिकृत धर्मांतरासंदर्भात विविध संघटनाच्या पाठपुराव्यामुळे दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास श्रीमती मीराबाई सुभाष हरेल यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला असून अद्याप पोलीस विभागाकडून कोणतीही कारवाई केलेली नसणे, तसेच संबंधित आरोपी कमल सिंघ यांनी अहमदनगर जिल्ह्यात धर्मांतरासाठी ७५० कोटी रुपये आणले असून कमल सिंघ यांच्या विरुद्ध जो आवाज उठवेल त्याच्याविरुद्ध त्यांच्या माणसाकडून आणि स्थानिक पोलिसांकडून 'atrocity' गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात येणे, यासंदर्भात आरोपीला मदत करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री यांनी आरोपी विरुद्ध कारवाई करु नये असे निर्देश पोलीस प्रशासनाला दिलेले असणे, याबाबत राहुरी पोलीस स्टेशनचे प्रभारी प्रताप दराडे आणि तपास अधिकारी यांनी आरोपी कमल सिंघ यांचा कडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतलेले असणे, आत्तापर्यंत शासनाने पोलिसांविरुद्ध व दोषींविरुद्ध कोणतीच कारवाई केलेली नसणे,

या गुन्हयांसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.अंबादास दानवे,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, अमोल मिटकरी, आमश्या पाडवी, विक्रम काळे, बाळाराम पाटील, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बाल आणि माता यांच्या आरोग्यांसंबंधी शासनाच्या पातळीवर सुमारे डझनभर योजना राबविण्यात येत असतांनाही मेळघाटात कोवळी पानगळ सुरु असल्याची धक्कादायक बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजी च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास उघडकीस आलेली असणे, माहे एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीत शून्य ते सहा वर्षाच्या जवळपास ५३ बालकांचा आणि १९ अर्भकांचा मृत्यू झालेला असणे, आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मेळघाटात सर्वसाधारण श्रेणीत अंदाजे ३२ हजार ५७६, तीव्र कुपोषित (सॅम) ४०९ तर मध्य कुपोषित (मॅम) श्रेणीत अंदाजे ३ हजार ३४६ बालके असल्याचे निदर्शनास आलेले असणे, मेळघाटात कुपोषित बालके, गर्भवती तसेच स्तनदा मातांना बालरोग आणि स्त्री रोग तज्ञांची सेवा उपलब्ध करुन देण्यास शासन स्तरावरुन होत असलेली दिरंगाई, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ कार्याच्या ठिकाणी पोहोचत नसणे किंवा आठवड्यातून २-३ दिवस हजेरी लावत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, स्थानिकांकडून मेळघाटातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञांची कायमस्वरुपी नेमणूक करावी अशी होत असलेली मागणी, कोवळी पानगळ थांबविण्यासाठी शासनाने करावयाची तातडीने उपाययोजना व याबाबत शासनाची भुमिका."

(५) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर आणि उपनगरात वास्तव्य करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना शिधावाटप दुकानांत कधीच पूर्ण धान्य मिळत नसल्याची गंभीर बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास समोर येणे, त्यामुळे सामान्य मुंबईकर जनता मेटाकुटीस आलेली असणे, मुंबई आणि उपनगरात अनेक शिधापत्रिकाधारकांकडे केवळ नावाला शिधापत्रिका असणे, मुंबई व उपनगरातील सुमारे दीड ते दोन लाख शिधापत्रिका कार्ड सद्यस्थितीत बंदवस्थेत असणे, सदर कार्ड पुनश्च सुरु करण्यात

अप्रकाशित प्रत

नागरिकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागणे, गत सात ते आठ महिन्यांपासून याबाबतची ऑनलाईन सेवा पूर्ण क्षमतेने कार्यरत नसणे, त्यामुळे शिधा मिळण्यासाठी शिधापत्रिका धारकांना आधारकार्ड क्रमांक सादर करण्यासाठी देण्यात आलेली दि. ३० जून, २०२२ पर्यंतच्या मुदतीत वाढ करण्याची असलेली नितांत आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मुंबई व उपनगरातील गोरगरीब शिधापत्रिकाधारकांत शासनाप्रती पसरत चाललेला असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगरातील शिधावाटप दुकानात पुरेसा शिधा उपलब्ध करून देण्यासह बंद असलेली शिधापत्रिकाकार्ड पुनश्च सुरु करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना येत असलेल्या अनंत अडचणी दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.अमरनाथ राजूरकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्हयात सोयाबीनच्या उभ्या पिकावर गोगलगाईंचा प्रादुर्भाव झाला असून शेतातील उभे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास येणे, याशिवाय येथे शेतातील भाजीपाल्यावरही गोगलगाईचा प्रादुर्भाव होणे, तसेच हिरव्या अळयांनीही पिके फस्त केली असणे, आधीच अतिवृष्टीमुळे पिके धोक्यात असणे, त्यात आता गोगलगाई व अळयांनी पिकांवर आक्रमण केल्यामुळे येथील शेतकरी पुन्हा संकटात सापडणे, त्यामुळे आता येथे सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट निर्माण होण्याची शक्यता यावर उपायोजना म्हणून येथील शेतकऱ्यांनी सोयाबीन व इतर पिकांवर महागडी औषधे फवारणे, मात्र त्याचा उपयोग न होणे, त्यामुळे आता पिकांचा उत्पादन खर्चही निघेल की नाही या चिंतेत येथील शेतकरी असणे, यामुळे या शेतपिकांच्या नुकसानीचे शासनाने तातडीने पंचनामा करुन बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देणे आवश्यक असतानाही त्यावरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील शेतकऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (७) ते (११)] —**

(७) **श्री.सचिन अहिर**, डॉ.मनिषा कायंदे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अग्रिम प्रत

"मुंबई मेट्रोची कारशेड कांजूरमार्ग येथून पुन्हा आरेच्या जंगलात करण्यासंदर्भात शासनाने घेतलेला निर्णय, सदर निर्णयास पर्यावरणवादी यांनी केलेला विरोध, मेट्रो ६ मार्गिककेचे कारशेड कांजूरमार्ग येथील जागेवर प्रस्तावित असणे, मेट्रो कारशेडसाठी कांजूर येथील सुमारे १५ हेक्टर जागेची आवश्यकता असणे, तत्कालिन महाविकास आघाडी सरकारने मेट्रो ३ चे कारशेड आरे येथून कांजूरमार्गला स्थलांतरित करण्याचा घेतलेला निर्णय, मुंबईतील मेट्रो रेल्वेचे कारशेड कोणत्या ठिकाणी असावे, याबाबत अभ्यास करुन राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांच्या उच्चस्तरीय समितीने दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास अहवाल तयार करणे, अभ्यासपूर्ण अहवालासाठी समितीने गोरेगांव आरे येथील प्रस्तावित ठिकाणी भेटी देणे, मेट्रो रेल्वेचे टप्पा-३ कारशेड आरे येथे उभारल्यास त्याठिकाणी एक हजार झाडे तोडल्याने जंगलाची हानी होणे, असा निष्कर्ष समितीने काढणे, अतिरिक्त कारशेड साठी पुढील काळात पुन्हा वृक्ष तोड होण्याची शक्यता, त्यामुळे मेट्रो रेल्वेची कारशेड आरे ऐवजी कांजूरमार्ग येथे केल्यास संयुक्तिक होईल, अशी शिफारस सदर समितीने करणे, राज्यात नुकतेच सत्तांतर झाल्यानंतर कांजूरमार्ग ऐवजी आरे गोरेगांव येथे कारशेड उभारण्याचा निर्णय घेण्यात येणे, परिणामी सामान्य जनतेच्या पैशांचा होत असलेला अपव्यय, मुंबईतील हरितपट्टे, पाणथळ जागा तसेच नद्यांचे पाणलोट क्षेत्रही नष्ट करण्याची शासनाची भूमिका, शासनाची पर्यावरणविरोधी भूमिका असल्याने पर्यावरणप्रेमीमध्ये प्रचंड संतापाची व चिडीची निर्माण झालेली भावना, शासनाच्या बदललेल्या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त बोजा पडणे, आरे येथील वृक्षांची हानी होणे, मेट्रोची कारशेड उभारण्याच्या संदर्भात फेरविचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

**(८)** **सर्वश्री अंबादास दानवे,** कपिल पाटील, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि उच्च शिक्षणाकरिता भाडे तत्वावर भूखंड घेऊनही त्यावर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम केलेले नसल्याचे बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, सदरहू आरक्षित भूखंड हे विविध संस्थांना सन २०१० मध्ये महानगरपालिकेने विकास योजनेतील भूखंड तसेच सुविधा भूखंड, शैक्षणिक प्रयोजनासाठी

अप्रकाशित प्रत

आरक्षित करुन वितरीत केलेले असणे, महानगरपालिकेने संस्थेशी केलेल्या भाडेपट्टा कराराच्या तारखेपासून पुढील दोन वर्षांच्या कालावधीत इमारत बांधकाम पूर्ण करुन शिक्षण सुरु केले नाहीतर भाडेपट्टा करार रद्द समजण्यात येईल अशा अटींचा समावेश उक्त करारात असो, सदरहू भूखंडावर कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नसल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागणार असल्याने स्थानिक विद्यार्थ्यांमध्ये तसेच त्यांच्या पालकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, भूखंड वितरीत केल्यानंतर आजपावेतो उक्त भूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम न करणाऱ्या संस्थांकडून भूखंड परत घेण्याची होत असलेली मागणी, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेली कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका."

(९) **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी राज्यातील वैधानिक विकास मंडळांची मुदत संपली असणे, प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र या विभागातील सर्व क्षेत्रातील असमतोल दूर करण्यासाठी घटनेत विशेष तरतूद करुन या मंडळांची स्थापना करण्यात आलेली असणे, अद्याप या सर्व विभागातील अनुशेष शिल्लक असताना अवैधानिक कारणांसाठी राज्यातील वैधानिक विकास मंडळांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव मागील सरकारने प्रलंबित ठेवला असणे, मराठवाडा विकास मंडळास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी मराठवाड्यातील ३५ खासदार-आमदारांनी व मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने केलेली असणे, तसेच कोकण आणि उत्तर महाराष्ट्रासाठी वेगळी विकास मंडळे निर्माण करण्यास कुणाचाही विरोध नसणे, तशाप्रकारचा स्वतंत्र प्रस्ताव पाठवण्याचा पूर्ण अधिकार सरकारला असणे, तथापि, मुदतवाढीचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याच्या मागील सरकारच्या कृतीमुळे मागास भागातील जनतेवर प्रचंड मोठा अन्याय होत असणे, राज्य सरकारने तातडीची बाब म्हणून वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव अतिशीघ्रतेने केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत असणे, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल**

असुधारित प्रत

**मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोट उपविभागातील अकोट ते पोपटखेड (जि.अकोला) रस्त्यावर बेकायदेशीर व अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर बेकायदेशीर वाहतुकीमुळे अकोट तालुक्यातील व अकोला जिल्हयातील घरकुलांच्या बांधकामासाठी रेती मिळत नसल्याने खाजगीरित्या अव्वाचे सव्वा भावाने नागरिकांना रेती विकत घ्यावयाची येत असलेली पाळी, अवैधरितीने मुरुम, गिट्टीचे उत्खनन करण्यांत येत असताना वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नंबर प्लेट नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शासनाला स्वामित्वधनापासून (रॉयल्टी) करोडो रुपयांचे होत असलेले नुकसान, तसेंच अकोट-पोपटखेड रस्त्यांवर होणाऱ्या अवैध वाहतुकीमुळे सदर रस्त्यांची बांधकाम विभागाला करावी लागत असलेली डागडुजी व त्यामध्ये निविदाच्या नावांखाली अधिकारीवर्गांकडून होत असलेला आर्थिक गैरव्यवहार, परिणामी, याप्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन चौकशी करण्याची आवश्यकता व त्यानुसार करण्यांत आलेली वा करावयाची कार्यवाही."

**(११)** **डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

**"**राज्यातील आदिवासी भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे, त्यामुळे हाताला कामे नसणे, रोजगारासाठी सतत स्थलांतर करावे लागणे, त्यामुळे लहान मुलांची हेळसांड होऊन ही मुले कुपोषणाला बळी पडून ती मृत्यूंच्या दारात पोहचणे, राज्यातील आदिवासी भागातील लहान मुलांचे कुपोषणामुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असून गेल्या दोन महिन्यात कुपोषणामुळे ३९ बालकांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक ५ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या लहान मुलांचे वास्तवात कुपोषणामुळे मृत्यू झालेले असतानाही शासन-प्रशासन ते मान्य करीत नसणे, या लहान मुलांच्या मृत्यूला वैद्यकीय कारणे देऊन हे बालमृत्यू लपविले जाणे, राज्यातील काही भागात ही कुपोषित आणि गर्भवती उपचार मिळण्यासाठी शासनाने विविध ठिकाणी सेंटर्स उभारण्यात येणे, आदिवासींसाठी आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी त्या-त्या भागात जागाही देण्यात येणे, पण तेथे काम करायला कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी तयार नसणे, यामुळे शासनाप्रती जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(१२) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापूर शहरात १९७७ पासुन २३ एकर जागेवर महात्मा गांधी प्राणी संग्रहालय अस्तित्वात असणे, शहराच्या पर्यटन वाढीत महत्वपुर्ण योगदान असणे, सोलापूर शहर व परिसरात २५० कि.मी. अंतरावर एकही प्राणी संग्रहालय उपलब्ध नसणे, परंतु मागील ३ वर्षापासून सदर प्राणी संग्रहालय बंद अवस्थेत असणे, अनेक वेळा सूचना व पत्रव्यवहार करून केंद्रीय प्राधिकरणाने ४३ त्रुटी प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देणे, सदर त्रुटी पुर्ण करण्यासाठी २ कोटी रुपयांची आवश्यकता असणे, त्रुटीत सुधारणा करण्याची वारंवार संधी देणे, तरीही प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे त्रुटीची पुर्तता न झाल्याने प्राणी संग्रहालयाच्या कारभारात सुधारणा होत नसणे, परिणामी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाने महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाची मान्यता काढून घेणे व प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना दुसऱ्या प्राणी संग्रहालयात पाठविण्याचे आदेश देणे, परंतु जवळपासच्या कोणत्याही प्राणी संग्रहालयाने संबंधित प्राणी सामावून घेण्यासाठी प्रतिसाद न देणे, प्राणी संग्रहालय बंद झाल्याने सोलापूरातील वन्यजीव संरक्षण, संवर्धन, वन्यजीव उपचार व पुनर्वसन, शिक्षण आणि संशोधन, जनजागरण चळवळीचे नुकसान होणे, एकुणच किचन स्टोअर, अद्ययावत दवाखाना व संरक्षक भिंतीची उंची वाढविणे व आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देणे, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे सोलापूरवासियात पसरलेला असंतोष, यामुळे प्राणी संग्रहालय बंद करण्याचा निर्णय तत्काळ स्थगित करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **श्री.जयंत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पनवेल महानगरपालिकेचे तत्कालिन उपमहापौर, तत्कालिन शिक्षण सभापती यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून तसेच अधिकाऱ्यांवर दडपशाही करून मौजे रोडपाली तालुका पनवेल येथील बौद्धवाडी सेक्टर १८ कळंबोली सर्वे नं.२२, २६/१, २७/१, २८/१, २९/१, ३०/१, ५०/१, ५७/१, ५७/२ या साधारणत: ५ एकर क्षेत्रावर तत्कालिन उपमहापौर व त्यांचे नातेवाईक यांनी सिडकोच्या अखत्यारीतील असलेल्या ५०० कोटी किंमतीच्या भूखंडावर जमिनीवर अनधिकृतपणे व्यावसायिक चाळ, बहुमजली इमारत व अनधिकृत मोठे पार्किंग, मोबाईल टॉवर इत्यादी अनधिकृतपणे अतिक्रमण करण्यात येणे, सदर अतिक्रमणे निष्कासीत करण्याकरीता विभागीय आयुक्त, कोकण विभाग, आयुक्त,

अप्रकाशित प्रत

पनवेल महानगरपालिका, सिडको प्रशासन, सिडको दक्षता विभाग, पोलीस प्रशासन तसेच सिडको व्यवस्थापकीय संचालक यांना नागरीकांकडून अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करण्यात येणे, सदर गंभीर विषयाबाबत नागरीकांकडून सर्व शासकीय यंत्रणेला पत्रव्यवहार करण्यात आला असतानाही तत्कालीन महापौर व त्यांच्या नातेवाईक यांनी केलेल्या अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणतीही कारवाई अद्याप न करण्यात येणे, तसेच ज्या नागरीकांनी तक्रार दाखल केल्याने तत्कालीन उपमहापौर व त्यांच्या नातेवाईकांकडून तक्रारदारांवर खोटे जातीवाचक गुन्हे दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याने तक्रारदार नागरीक भयभीत असणे, सिडको प्रशासनाने अनधिकृत बांधकामावर ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे अशांना नोटीसा देण्यात येणे, परंतु ज्या जागेवर अतिक्रमण केले आहे अशा अतिक्रमणधारकांना उपायुक्त, अनधिकृत बांधकाम विभाग व मिळकतकर यांनी सदर अतिक्रमणांना घरपट्टी नियमित करून देण्यात येणे, तत्कालीन महापौर व इतर नातेवाईक यांनी सिडकोच्या ५०० कोटी किंमतीच्या भूखंडावर केलेले अतिक्रमण तातडीने निष्कासित करून कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

(१४) **श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नवकार बिल्डर अॅन्ड डेव्हलपर्स, बाभई नाका, बोरिवली यांनी आय.सी. कॉलनी बोरिवली येथील हॅप्पी होम को.ऑ.हा.सो. सन २०१०-२०११ मध्ये विकासासाठी घेणे, सदर सोसायटी पोलीस विभागाच्या चार सदनिका असणे, विकासासाठी पोलीस विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र जरुरी असणे, सदर प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने प्रकल्पास विलंब होणे, अवर सचिव (ज-१) महसुल व वन विभाग यांनी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी पैशाची मागणी करणे, तसेच लोणावळा जिल्हा पुणे येथे विकासकाकडून एक सदनिकेची मागणी केल्याने विकासकाने सदनिका त्यांच्या नावावर करणे, त्यानंतरही संबंधित विकासकाकडून पैशाची मागणी करणे, अवर सचिव, महसूल व वन विभाग यांच्या व त्यांच्या पत्नीच्या ५८ लाख रुपये बँक खात्यात तसेच रोख रक्कमेव्दारे सन २०१३-१४ ते सन २०२०-२०२१ या कालावधीमध्ये देण्यात येणे, सदर मंत्रालयीन अधिकाऱ्याकडे त्यांच्या आर्थिक उत्पन्नापेक्षा मोठ्या प्रमाणात संपत्ती असणे, त्यांच्याकडे असलेल्या परवाना धारक शस्त्राव्दारे धमकी देण्यात येणे त्यांच्याकडून इतर व्यक्तींना नाहक त्रास देण्यात येणे

यासंदर्भात मा. मुख्यमंत्री, महसूल विभाग, गृह विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी यांच्याकडे जून, २०२२ मध्ये तक्रार दाखल करण्यात येणे यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी यांनी प्रधान सचिव, महसूल यांच्याकडे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम १७ (अ) नुसार दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ रोजी चौकशीसाठी संबंधित अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्याबाबत विनंती करणे परंतु अद्यापपर्यंत महसूल विभाग परवानगी देण्यास दिरंगाई करणे तसेच सदरहू अर्जाच्या अनुषंगाने चौकशी न करणे, एम.एच.बी. पोलीस ठाणे, मुंबई यांनीही जवाब नोंदविण्यासाठी बोलाविण्यात येणे परंतु संबंधितांनी जवाब नोदविण्यासाठी दिरंगाई करणे, आयकर विभागानेही दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी सदर व्यवहारासंदर्भात दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी नोटीस देऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे सदर प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५)** **श्री.आमश्या पाडवी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नंदुरबार जिल्ह्यातील प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प तळोदा यांनी पदाचा गैरवापर करत मनमानी कार्यपध्दती सुरु करणे, त्यांच्या विरोधात अनेक तक्रारी प्राप्त होणे, आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा अंतर्गत तासिका तत्वावर असलेल्या जवळपास ६०० शिक्षकांना कामावरुन कमी करण्यात आल्यामुळे संबंधित तासिका शिक्षकांनी पुन्हा कामावर रुजू करण्याबाबत व इतर विविध प्रश्नांबाबत दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे रस्ता रोको आंदोलन करणे, प्रकल्प अधिकारी डॉ.मैनांक घोष यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेची निवडणूक लक्षात घेऊन त्यांच्या मर्जीतील केवळ ६० कर्मचाऱ्यांना कामावर रुजू करुन घेणे, विशेषतः निवडणूक आचारसंहिता आदेश काढून आदर्श आचार संहिता व नियम यांचे उल्लंघन करणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी लेखी निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, धुळे (निवडणूक शाखा), तसेच जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या निदर्शनास आणून देणे, तथापि त्यांच्यावर अद्याप कोणती कारवाई करण्यात आलेली नसणे, तसेच आदिवासी विकास विभागांतर्गत इतर प्रकल्पात क्रीडा शिक्षकांना सन २०२२-२३ साठी नियुक्ती देण्यात येणे, परंतू तळोदा प्रकल्पातील शाळा दिनांक १३ जून, २०२२ पासून सुरु झालेल्या असतांनाही सदर प्रकल्पात शाळा सुरु होऊन दोन महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप पर्यंत क्रीडा शिक्षक नियुक्ती करण्यात

अप्रकाशित प्रत

आलेली नसणे, प्रकल्प अधिकारी डॉ.मैनांक घोष हे मनमानी करुन स्थानिक आदिवासी कर्मचाऱ्यांची हेळसांड करीत असणे, त्याच प्रमाणे तळोदा प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या शासकीय आश्रम शाळेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या रोजंदारी कर्मचाऱ्यांनाही कामावर घेण्यास टाळाटाळ करण्यात येणे, उपरोक्त प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी प्रधान सचिव, आदिवासी विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारात करण्यात येणे, शासनाने याप्रक्ररणी तात्काळ चौकशी करुन मनमानी पध्दतीने काम करणा-या प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प तळोदा, जि.नंदुरबार यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(१६) **श्री.शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आमदार निधी, खासदार निधी, ३०५४, २५१५, अशा शासनाच्या वेगवेगळ्या हेडमधून ग्रामीण भागातील गावांच्या विकासासाठी निधी मंजूर होत असणे, परंतू हा निधी मंजूर झाल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीला देखभाल दुरुस्ती, ना-हरकत प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे मागवली जात असणे, काही वेळा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांकडून ही कागदपत्रे जाणीवपूर्वक देणे टाळले जाणे, त्यामुळे मंजूर झालेला निधी माघारी जाणे व विकासकामे प्रलंबित राहणे. उदा. १) दिनांक ३१ मार्च, २०२२ अन्वये अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम २०२१-२२ अंतर्गत सातारा जिल्हयातील तासगाव (ता.सातारा) येथे शादीखाना हॉल बांधण्यासाठी २५ लक्ष रुपये मंजूर करण्यात येणे, हा निधी अद्यापही संबंधित ग्रामपंचायतीने आवश्यक कागदपत्रे न दिल्यामुळे शादीखाना हॉल बांधण्यात निर्माण झालेल्या अडचणी, २) मौजे देऊर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरणासाठी खासदार फंडातून १० लाख रुपयाचा निधी मंजूर करण्यात येणे, परंतु ग्रामपंचायतीने आवश्यक ती कागदपत्रे न दिल्यामुळे सदरील निधी परत जाणे, ग्रामपंचायतीकडून ही कागदपत्रे मिळालेली नसतांना हा निधी परत न जाता विकास कामे होण्यासाठी ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांची अट शिथिल करुन शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१७) **प्रा.राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **रोजगार हमी योजना मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अग्रिम प्रत

"अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड तालुक्यात मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजने अंतर्गत जामखेड तालुक्यातील मंजूर ३७६ कामांपैकी २०० पेक्षा अधिक कामे व कर्जत तालुक्यातील ३७२ कामांपैकी ११० हून अधिक कामे पूर्ण झाली असणे, तसेच जिल्हा नियोजन समिती, अहमदनगर अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता लेखाशिर्ष- इतर जिल्हा योजनेतून उपजिल्हाधिकारी, रोहयो यावेकडील प्रशासकीय मान्यताप्राप्त योजनेतील १५६ कामांना मंजुरी दिली असून झालेली कामे निकृष्ट असणे, या योजनेतून केलेली कामे ही अस्तित्वातील रस्त्यांपेक्षाही दर्जाहिन झालेली असणे, या कामांच्या टिकावूपणाची शाश्वती देण्यात आली नसणे, या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर शासकीय निधीवा अपहार झाला असणे, कामांची बिले बोगस लाभार्थीच्या नावे अदा केली असणे, कामे यंत्रसामुग्रीने केली असली तरी या कामांचे लॉगबुक उपलब्ध नसणे, त्यामुळे यात शंका निर्माण होणे, तसेच केलेली कामे ही ग्रामपंचायत आराखड्याप्रमाणे नसल्याने महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ च्या अटी व शर्थीचे उल्लंघन झाले असणे, यास्तव कामांची सखोल चौकशी करण्याकरीता त्रयस्त समितीची नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, तसेच संबंधीत ठेकेदार व अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१८) **श्री.किरण सरनाईक,** डॉ.सुधीर तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात शिक्षक भरती प्रक्रिया पवित्र पोर्टल प्रणाली द्वारे होत असणे, मध्यंतरीच्या काळात पारदर्शक नोकरी भरती या गोंडस नावाखाली शिक्षकांची लेखी परीक्षा घेऊन त्यातील गुणांच्या आधारे थेट भरतीचा प्रस्ताव शासनाने तयार केलेला असणे, परंतु शिक्षक भरती करीता आवश्यक असणारी टीईटी परीक्षेमध्ये होत असलेले भ्रष्टाचाराचे आरोप तसेच ऑनलाईन पद्धतीने ज्या परीक्षा होत आहेत जसे की आरोग्य सेवा, म्हाडा आणि टीईटी पेपरफुटी चे प्रकरण समोर येत असणे,बोगस टीईटी प्रमाणपत्रामुळे अपात्र विद्यार्थी शिक्षक म्हणून रुजू झालेले असणे, याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत असणे व पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, सदर शिक्षक भरती प्रक्रिया जुन्या पारदर्शक पद्धतीने राबविल्यास विभागातील पात्र शिक्षकांना विभागातच संधी मिळेल व त्याचा फायदा शाळेला व विद्यार्थ्यांना होण्याची शक्यता असणे, परिणामी पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया बंद करून जुन्या पद्धतीनेच चालू करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची

अप्रकाशित प्रत

कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**आठ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**
**(बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अल्पकालीन चर्चा) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री सचिन अहिर,** नरेंद्र दराडे, डॉ. मनीषा कायंदे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"मुंबईतील तसेच मुंबई बाहेरील गिरण्या अनेक वर्षापासून बंद असून या बंद गिरण्यांच्या जमिनीवर असलेल्या इमारतीमध्ये जवळजवळ दोन पिढया म्हणजेच ५० वर्षापेक्षा जास्त काळ ४००० भाडेकरु वास्तव्यास असणे, परंतु सध्या या इमारतीची अवस्था कोणत्याही क्षणी कोसळून मोठी जिवीतहानी होण्याचा धोका निर्माण होणे, याकरिता मुंबई विकास नियमावली ५८ (७) १९९१ अंतर्गत गिरणी मालकांनी या इमारतीचे पुनर्वसन करुन भाडेकरुंना देण्याची अट घालण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने लक्ष घालून ज्याप्रमाणे घरकुल योजनेअंतर्गत घरे बांधून दिली त्याच धर्तीवर गिरण्यांमधील कामगारांचे म्हाडा अंतर्गत पुनर्वसन करण्याचे धोरण आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची कार्यवाही व भूमिका."

(२) **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, अंबादास दानवे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचे विविध प्रश्न गेल्या अनेक कालावधीपासून प्रलंबित असणे, जसे की, एम.फीलधारक प्राध्यापकांना कॅस चे लाभ देण्यात यावेत, आरसीओसीला मुदतवाढ देण्यात यावी, प्राध्यापकांना पी.एच.डी च्या दोन आगाऊ वेतनवाढी मिळाव्यात, कॅस हे ड्यू डेट पासून देण्यात यावेत, स्टॅट्यूटप्रमाणे प्राध्यापकांना १२ रजा मिळाव्यात, सन १९९१ ते २००० कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेटसेट अधिव्याख्या त्यांना त्यांच्या सेवा नियुक्ती

असुधारित प्रत

दिनांकापासून ग्राह्य धरुन इतर अनुषंगिक लाभ देण्यात यावेत, तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधनात वाढ करावी, तासिका तत्वावरील प्राध्यापक नेमतांना प्रथम प्राधान्य पी.एच.डी / नेट /सेट धारकांना द्यावेत, ते उपलब्ध झाले नाहीत तर इतरांना तासिका तत्वावर नियुक्त्या देण्यात याव्यात व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, प्राचार्य व शिक्षक संवर्गातील सर्व रिक्त पदे तातडीने भरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, प्राचार्य व शिक्षक संवर्गातील सर्व रिक्त पदे तातडीने भरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, यांसारख्या महत्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी तत्कालीन मंत्री महोदयांच्या सूचनेनुसार उच्च शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त होणे, तरीही त्यावरती कोणतीच कार्यवाही होत नसल्याने राज्यभर प्राध्यापकांमध्ये पसरलेला असंतोष व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : शासकीय विधेयके –**

**(१) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(क)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ख)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास**

अप्रकाशित प्रत

**दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ग)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(क)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २७ — महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती विधेयक, २०२२"

**(ख)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २६ — महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**दहा : मुख्यमंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** नागरी विमानचालन महासंचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी, कार्यालयीन ज्ञापन क्रमांक

एव्ही.२४०११/१/९५- व्ही बी (खंड सहा), दिनांक ६ जुलै, २००७ द्वारे नवी मुंबई, महाराष्ट्र येथे सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (पीपीपी) नवीन (ग्रीनफिल्ड) विमानतळ उभारण्यास 'तत्वत:' मान्यता दिली आहे;

**आणि ज्याअर्थी,** नवी मुंबई येथील उक्त विमानतळाला "लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई विमानतळ" असे नाव देणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे पाठवणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी आता,** महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या नियम १०६ नुसार, महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे, नवी मुंबई येथील उक्त विमानतळाला "लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई विमानतळ" असे नाव देण्याची शिफारस भारत सरकारला करते."

**अकरा : उद्योग मंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "भूमिसंपादन अधिनियम" असा केला आहे) महाराष्ट्र राज्याला लागू असताना, त्याच्या कलम १०५ क च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, पहिल्या अनुसूचीनुसार नुकसानभरपाईचे निर्धारण करण्याशी संबंधित असणाऱ्या भूमिसंपादन अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी, महाराष्ट्र औदयोगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मऔवि अधिनियम" असा केला आहे) याचा समावेश असलेल्या, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींखालील भूमी संपादन करण्याच्या प्रकरणांना लागू होतील, किंवा यथास्थिति, ज्यामुळे नुकसानभरपाई कमी होणार नाही किंवा नुकसानभरपाई, पुनर्वसन व पुनर्वसाहत यांच्याशी संबंधित असलेल्या भूमिसंपादन अधिनियमाच्या तरतुदीचे सौम्यीकरण होणार नाही अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादांसह किंवा फेरबदलांसह लागू होतील;

**आणि ज्याअर्थी,** अशी अधिसूचना काढल्यावर, उक्त कलम १०५ क च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार, भूमिसंपादन अधिनियमाच्या

अप्रमाणित प्रत

तरतुदी, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींखालील भूमी संपादन करण्यासाठी लागू असणार नाही;

**आणि ज्याअर्थी,** सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ द्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मऔवि अधिनियमामध्ये अशी तरतूद आहे की, जिल्हाधिकाऱ्यास नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करताना, भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम २६ ते ३० यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी आणि इतर संबंधित तरतुदी, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फेरबदलांस अधीन राहून, मार्गदर्शक राहतील;

**आणि ज्याअर्थी**, मऔवि अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रदेय असलेल्या नुकसान भरपाईशिवाय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने, त्याच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ च्या परिपत्रकाद्वारे सर्वसमावेशक पुनर्वसन धोरण, २०१९ तयार केले आहे;

**आणि ज्याअर्थी,** नुकसानभरपाई व पुनर्वसनासंबंधीच्या मऔवि अधिनियमाच्या आणि तयार केलेल्या उक्त धोरणाच्या तरतुदी, भूमिसंपादन अधिनियमाच्या नुकसानभरपाईच्या व पुनर्वसनाच्या तरतुदींपेक्षा अधिक लाभदायक आहेत;

**त्याअर्थी आता,** भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम १०५ क च्या पोट-कलम (२) चे परंतुक आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियमांचे नियम १०६ यांनुसार, महाराष्ट्र विधानपरिषद असा ठराव करते की, भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम १०५ क च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनार्थ, अधिसूचना काढण्यात यावी."

**बारा : (मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ व बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, राजहंस सिंह, चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय सुरेश धस, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री गोपिचंद पडळकर, प्रविण दटके, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण पोटे पाटील, निलय नाईक, वसंत खंडेलवाल, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून मागील काळात मुंबई शहराच्या तसेच एमएमआर भागातील मुलभूत पायाभूत सुविधांची पुर्णपणे दुरवस्था झालेली असणे, मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण किवा परिवहन (गतीशीलता) हे महत्वाचे मुद्दे असून मुंबई शहराकरिता २८६ कि.मी.च्या मेट्रोचे काम धीम्या गतीने झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी मेट्रोचा

अप्रकाशित प्रत

खर्च १० हजार कोटीने वाढून मुंबईकरांना मेट्रोपासून वंचित ठेवण्यात येणे, मागील काळात एसआरएच्या माध्यमातून १५ लाख घरे उपलब्ध होण्याची आवश्यकता असताना फक्त २ लाख घरांची निर्मिती एसआरएच्या माध्यमातून झाल्याचे निर्दशनास येणे, एसआरएमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारामुळे झोपडपट्टी पुर्नविकास प्रकल्प प्रलंबित असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती न होणे, २०११ पर्यंत सर्व झोपडपट्टीतील घरांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे देण्याचा कायदा होऊनही सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरूंना बेघर करून त्यांना भाडे न मिळणे, तसेच, बी.डी.डी. चाळीचा खोळंबलेला पुनर्विकास, धारावीचा खोळंबलेला पुनर्विकास पोलीसांकरिता मोफत घरांच्या धोरणाची अंमलबजावणी न होणे, मुंबई शहरातील गावठाण व कोळीवाडयाकरिता विशिष्ट डी.सी.आर. अद्याप तयार न होणे, तसेच विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरातील फनेल झोनमधील पुनर्विकास खोळंबला असणे, गिरणी कामगार व पोलीसांच्या घरकुल योजनेमध्ये संथगतीने झालेली प्रगती, केंद्र शासनाच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्यांचा पुर्नविकास न होणे, तसेच रेल्वेच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांना संरक्षण न मिळणे व वन जमिनीवरील रहिवाशांना पायाभूत सुविधांपासून वंचित रहावे लागणे, अशा अनेक प्रकारच्या घरकुल योजनांमध्ये व एसआरए आणि म्हाडामध्ये झालेल्या भ्रष्टाचारामुळे हा विकास खोळंबलेला असणे, एसआरए व म्हाडामध्ये विशेष करून गेल्या अडीच वर्षामध्ये प्रति चौरस फुटाच्या किंमतीचा बाजार मांडलेला असणे, तसेच, गेल्या २५ वर्षांमध्ये मोठया प्रमाणावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार व गैरव्यवस्थापन परिणामी मुंबईकरांच्या स्वप्नातील मुंबई दृष्टोत्पतीस न येणे, रस्त्यांमधील चरभरणी, उद्याने व बाजारांमध्ये तसेच कोविड कालावधीत सुध्दा मोठया प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस आला असून गेल्या २५ वर्षातल्या मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहाराची मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी नेमण्याची आवश्यकता, तसेच, विशेष सीएजी (कॅग) ऑडिट करण्याची आवश्यकता, मोठया प्रमाणावर गेल्या २ महिन्यांमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या संगणक खरेदीमध्ये घोटाळा झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक २७ वस्तू अद्यापपर्यंत मिळाल्या नसणे, त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर होणारा दुष्परिणाम, तसेच मुंबईची मेट्रो ही मास ग्रीन ट्रान्सपोटेशन सिस्टीम असून मेट्रोचे काम थांबल्यामुळे मुंबईच्या पर्यावरणाचा झालेला ऱ्हास तसेच पवई तलावामध्ये सायकल ट्रॅक

अग्रिम प्रत

करण्याचा अट्टाहास, त्यामुळे मुंबईच्या पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, मुंबई शहराच्या कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट होत नसल्यामुळे मुंबईचे वातावरण व हवामान प्रदुषित होत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच मुंबई शहरातील शासकीय जमिनीवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना आकारण्यात आलेला अकृषीक कर पूर्णपणे वगळण्याची आवश्यकता, मुंबईच्या कोळीवाडा व गावठाणाकरिता वेगळा डीसीआर तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्यामुळे मुंबईचे कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था, मुंबई शहरामध्ये पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे खास करुन मुंबई पोलिसांची भरती करण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा राबविण्याची आवश्यकता, तसेच माहे नोव्हेंबर, २०१९ ते जुन २०२२ या कालावधीमध्ये गृहविभागात मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, गैरव्यवहार व अनियमितता झालेली असून यासंदर्भात शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**तेरा : "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या विषयावर चर्चा.**

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**चौदा : अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(१) डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४३**

"राज्यात विशेषत: मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ मराठवाड्यात शाश्वत सिंचन अभियान सुरु करुन मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे"

**(२) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६८**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या

अग्रिम प्रत

आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) **डॉ.वजाहत मिर्झा, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३४**

"राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

अग्रिम प्रत

**"राष्ट्रगीत"**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद